महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

जानेवारी-फेब्रुवारी २०१०
वर्ष ५- अंक ६ व ७

# सृजन

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## मनोगत



श्री. सुब्रत रथो

**"सृजन"** च्या मागील अंकाच्या मनोगतात मी आपणा सर्वांना वीजनिर्मिती उत्पादनातील सातत्य टिकविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले होते. गेल्या संपूर्ण महिनाभरात आपल्या वीजनिर्मितीत, विशेषकरुन औष्णिक वीजनिर्मितीत तुम्ही सर्वांनी सातत्यपूर्ण कामगिरी करुन माझ्या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद दिलेला दिसत आहे, ही समाधानाची बाब आहे. ही कामगिरी उत्तरोत्तर अशीच ठेवून वीजनिर्मितीच्या ठरवून दिलेल्या वार्षिक उद्दिष्टाची पूर्ती व्हावी, अशी अपेक्षा आहे.

चंद्रपूर औ.वि. केंद्रात पाणीसाठा पुरेसा नसल्याने तेथील वीज उत्पादनावर एप्रिल-मे महिन्यांत परिणाम होण्याची शक्यता आहे. तथापि, या काळात अन्य वीजकेंद्राची जबाबदारी अनेक पटीने वाढणार आहे. अन्य ठिकाणचे निर्मिती संच अखंडित विनाव्यत्यय कार्यरत राहावेत, यासाठी सर्व ती उपाययोजना उर्वरित वीजनिर्मिती केंद्रांनी आत्तापासूनच करुन ठेवावी, जेणेकरुन चंद्रपूर येथील वीज उत्पादनातील घट दुसऱ्या वीजकेंद्रातून भरुन काढण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न आपण करु शकू.

महानिर्मितीच्या औष्णिक वीजनिर्मितीत आता वाढ होत आहे, आपले परळी व पारस येथील प्रत्येकी २५० मेगावॅटचे आणखी दोन संच पूर्ण क्षमतेने येत्या काही दिवसांत कार्यरत होतील. या आर्थिक वर्षात खापरखेडा व भुसावळ येथील प्रत्येकी ५०० मेगावॅटचे संचदेखील महानिर्मितीच्या परिवारात दाखल होतील. याव्यतिरिक्त आपले अन्य औष्णिक प्रकल्पदेखील वर्ष-दोन वर्षांत वीजनिर्मिती करु लागतील, हे चित्र राज्यातील वीजटंचाईवर मात करण्याचे दृष्टीने निश्चितच समाधानकारक आहे. परंतु, औष्णिक वीजनिर्मिती वाढणे याचा एक अर्थ म्हणजे नव्या संचाच्या संचलनासाठी अतिरिक्त इंधन कोळशाचा वापर करणे होय. आपल्या वीजनिर्मिती केंद्रामुळे परिसरातील एकूणच पर्यावरणाला बाधा पोहोचणार नाही, याची दक्षता आपण सर्व वीजनिर्मिती केंद्रातर्फे क्षेत्रीय पातळीवर एरवीसुध्दा घेत असतोच. वरील सर्व पार्श्वभूमीवर मी तुम्हाला सांगू इच्छितो की, आता पर्यावरणरक्षणाच्या बाबतीत आपल्या सर्वांवरची जबाबदारी आणखी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. एकीकडे औष्णिक वीजनिर्मितीत वाढ करायची आणि दुसरीकडे प्रदूषण नियंत्रणासाठी अथक कार्यरत राहायचे ही निश्चितच एक दुहेरी कसरत आहे. वीजग्राहक जनतेला स्वाभाविकपणे प्रदूषणविरहीत वीजनिर्मिती हवी आहे आणि आपलेही उद्दिष्ट्य अंतिमत: तेच आहे. हे साध्य करताना आपल्या वीजनिर्मिती केंद्रातील प्रदूषणनियंत्रण यंत्रणा अत्यंत कार्यक्षमतेने कार्यरत ठेवणे अत्यावश्यक आहे. त्यात प्रसंगी बिघाड झाल्यास तो युध्दपातळीवर दुरुस्त करण्यास प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे.

विशेषत: राखेच्या प्रदूषणाबाबत क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रमुखांनी अत्यंत जागरुक राहणे आवश्यक आहे. चिमणीद्वारे होणारे राखेचे उत्सर्जन विहित मर्यादेतच असावे, याबाबतीत निर्धारित निकषांची काटेकोर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. औष्णिक वीजकेंद्र परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड तसेच वृक्ष संवर्धन सातत्याने केले पाहिजे. राख हाताळणी विभागांनी राखेच्या पाईपलाईनची देखभाल दुरुस्ती करताना आजूबाजूच्या परिसराला प्रसंगी कोणताही उपद्रव होणार नाही, याची दक्षता घ्यायलाच हवी. इतकेच नव्हे तर राखेच्या उपयोगितेसाठी ती राख वाहून नेणाऱ्या वाहतूकदार-कंत्राटदार यांना राखेच्या योग्य वाहतुकीसाठी आवश्यक त्या सूचना देणे आवश्यक आहे. त्याची अंमलबजावणी होत नसल्यास सर्व संबंधितांना कडक समज देऊन प्रसंगी योग्य ती कार्यवाहीदेखील करावी. या कामात त्यांच्याकडून कुचराई झाल्यास महानिर्मितीला अकारण टीका सहन करावी लागते. यापुढे परिसरातील पर्यावरणविषयक सर्व जबाबदारी त्या त्या क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांची राहील, हे मी स्पष्ट करत आहे. विद्युतकेंद्रांना मुळात चांगल्या दर्जाचा कोळसा प्राप्त होणेसाठी मुख्यालय स्तरावर अथक प्रयत्न केले जात आहेतच.

(पुढील मजकूर पृष्ठ क्र. १६ वर)

"महानिर्मितीच्या औष्णिक वीजनिर्मितीत आता वाढ होत आहे, आपले परळी व पारस येथील प्रत्येकी २५० मेगावॅटचे आणखी दोन संच पूर्ण क्षमतेने येत्या काही दिवसांत कार्यरत होतील. या आर्थिक वर्षात खापरखेडा व भुसावळ येथील प्रत्येकी ५०० मेगावॅटचे संचदेखील महानिर्मितीच्या परिवारात दाखल होतील. आता पर्यावरणरक्षणाच्या बाबतीत आपल्या सर्वांवरची जबाबदारी आणखी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. एकीकडे औष्णिक वीजनिर्मितीत वाढ करायची आणि दुसरीकडे प्रदूषण नियंत्रणासाठी अथक कार्यरत राहायचे ही निश्चितच एक दुहेरी कसरत आहे. वीजग्राहक जनतेला स्वाभाविकपणे प्रदूषणविरहीत वीजनिर्मिती हवी आहे आणि आपलेही उद्दिष्ट्य अंतिमत: तेच आहे...."

(पृष्ठ क्र. १ वरून मजकूर पुढे सुरू)

आपल्या नवीन परळी व चंद्रपूर औष्णिक केंद्रावर नुकतेच समाजकंटकांकडून दुर्दैवी हल्ले झाले. महानिर्मितीच्या व्यवस्थापनाने या सर्व प्रकाराची गंभीर दखल घेतली असून यापुढे अशा हल्ल्यांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी सर्व आवश्यक कठोर उपाययोजनांची अंमलबजावणी तातडीने केली जात आहे. याबाबतीत सुरक्षा विभागाच्या वाढत्या जबाबदारीची जाणीव सर्व संबंधितांना होणे जरुरीचे आहे.

वीजकेंद्रात अनेक कंत्राटदारांकडून विविध प्रकारची कामे करुन घेण्यात येत असतात. ही कामे योग्य पध्दतीने आणि योग्य पर्यवेक्षणाखाली होत आहेत की नाहीत, सर्व अटींचे पालन केले जात आहे की नाही, याची काळजीपूर्वक खातरजमा क्षेत्रीय पातळीवर होणे अत्यंत आवश्यक आहे. काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित साधनसामुग्री, जुने भंगार संबंधित ठेकेदाराने पुन्हा वीजकेंद्राकडे सुपूर्त केल्यानंतरच काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिले गेले पाहिजे. चंद्रपूरच्या दुर्दैवी घटनेवरुन आपण किमान एवढा बोध घेणे तरी गरजेचे आहे.

आपल्या विद्युत केंद्रातील अभियंते व कर्मचारी यांना मी आवर्जून सांगू ईच्छितो की त्यांनी भयमुक्त भावनेने तसेच कुणालाही झुकते माप न देता कंपनीच्या नियमांस व शिस्तीस अनुसरुनच कार्यरत रहावे. प्रामाणिकपणे कंपनीची सेवा करणारे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना संपूर्ण संरक्षण दिले जाईल, याबाबत मी सर्वांना आश्वस्त करु ईच्छितो. मात्र वीजकेंद्राच्या कामात कोणताही गैरप्रकार निदर्शनास आल्यानंतर गैरप्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्यात येईल, हेही मी येथे स्पष्ट करु ईच्छितो.

मध्यंतरी आपल्या काही विद्युतकेंद्रांमध्ये कंत्राटी कामगारांचा संप झाला. तथापि, या कालावधीत महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करुन वीजनिर्मितीत व्यत्यय येऊ दिला नाही, हे उल्लेखनीय आहे. वीजनिर्मिती कार्यालयातील कंत्राटी कामगारांच्या श्रमांचे मूल्य महत्त्वाचे आहेच. तथापि, आपल्या कर्मचाऱ्यांनीही आपल्या वैयक्तिक परिश्रमातून आपली सक्षमता अशीच दाखवून द्यायला हवी. वीजनिर्मिती हे एक सामूहिक कार्य असून त्यातील एखादा समूह प्रसंगपरत्वे कार्यापासून परावृत्त होत असेल तर इतरांनी अतिरिक्त योगदान देणे अभिप्रेत असते. या प्रसंगी आपल्या कर्मचाऱ्यांनी बाजी लावून धरली याबद्दल सर्व संबंधित कर्मचारी अभिनंदनास पात्र आहेत. वस्तुत: कंत्राटी कामगारांसाठी सुयोग्य वेतनदराची शिफारस करण्यासाठी आता एका तज्ञ समितीचे गठन करण्यात येत आहे. या समितीच्या शिफारशीनुसार कंत्राटी कामातील अटी व शर्ती यामध्येदेखील बदल अपेक्षित आहे. कंत्राटदारांची एकूण कामगिरी, कंत्राटी कामगारांची उत्पादकता लक्षात घेऊन त्याप्रमाणे अपेक्षित कामगिरी न बजावणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक तरतूद, याबाबत देखील या समितीकडून शिफारशी केल्या जाणार आहेत.

महानिर्मितीमध्ये प्रदीर्घ कालावधीनंतर सर्व स्तरावरील अभियंते व कर्मचारी यांना फार मोठ्या प्रमाणावर पदोन्नतीचा लाभ मिळालेला आहे. बदली-बढती संबंधित नवीन धोरणातील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करुन तसेच संपूर्ण पारदर्शक पध्दतीने हि प्रक्रिया पार पडलेली आहे.

प्रशासकीय बदलीमुळे काही अभियंते-कर्मचारी यांची वैयक्तिक आयुष्यातील समस्यांमुळे सध्या गैरसोय होत असावी, याची मला जाणीव आहे. तथापि, दैनंदिन कामातील साचलेपणा व मरगळ दूर व्हावी, हाही एक दृष्टीकोन या बदली धोरणामागे आहे. नवी जबाबदारी पेलण्यासाठी हे अभियंते-कर्मचारी सक्षम व्हावेत हा त्यामागचा उद्देश आहे. सकृतदर्शनी बदली ही गैरसोयीची वाटली तरीही कर्मचाऱ्याच्या एकूण करिअरच्या विकासासाठी ही बाब नंतर फायद्याचीच ठरेल. विशेषत: महानिर्मितीने आखलेल्या मोठ्या प्रमाणावरील प्रकल्प विस्तार कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर गुणवान व सक्षम कर्मचाऱ्यांना यापुढेदेखील पदोन्नतीच्या अनेक संधी प्राप्त होण्यासारख्या आहेत.

खाजगी क्षेत्रातील आकर्षक वेतनाच्या पार्श्वभूमीवरदेखील महानिर्मितीच्या सेवेत कार्यरत असणाऱ्या अनेक गुणवान कर्मचाऱ्यांना कोणत्या प्रतिकूल परिस्थितीत काम करावे लागते, याची व्यवस्थापनाला नक्कीच जाणीव आहे. गुणवत्तेवर आधारित कालबध्द पदोन्नती तसेच कामगिरीवर आधारित वेतनवाढ यांसारख्या बाबींची अंमलबजावणी करणेबाबत मला अनेक कर्मचाऱ्यांकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सकारात्मक वातावरणात कर्मचारी संघटनांनी याबाबत योग्य त्या अभ्यासपूर्ण माहितीसह विधायक चर्चेचा मार्ग अवलंबला तर अशा सूचनांचा नक्कीच विचार केला जाईल. महानिर्मितीच्या प्रगतीच्या दृष्टीकोनातून यासंदर्भात कर्मचाऱ्यांसाठी आगामी काळात अधिक आकर्षक मोबदला व त्यांच्या करिअरच्या विकासासाठी कटीबध्द योजना या माध्यमातून अशा गुणवान कर्मचाऱ्यांचा विकास करण्यासाठी कंपनी नक्कीच प्रयत्नशील राहील.

**सुब्रत रथो**
व्यवस्थापकीय संचालक

"गुणवत्तेवर आधारित कालबध्द पदोन्नती तसेच कामगिरीवर आधारित वेतनवाढ यासारख्या बाबींची अंमलबजावणी करणेबाबत मला अनेक कर्मचाऱ्यांकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सकारात्मक वातावरणात कर्मचारी संघटनांनी याबाबत योग्य त्या अभ्यासपूर्ण माहितीसह विधायक चर्चेचा मार्ग अवलंबला तर अशा सूचनांचा नक्कीच विचार केला जाईल."

संपादक :
महेश आफळे
(जनसंपर्क अधिकारी)
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक,
सृजन (महानिर्मिती),
प्रकाशगड, दुसरा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by
Shri. Mahesh Aphale of
Maharashtra State Power
Generation Co. Ltd.
**Printed at Hema Arts,**
121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka,
W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Hongkong Bank Bldg, M.G. Road, Fort,
Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.